NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक १०.११.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) खापरखेडा पोलीसांची कामगिरी :— अग्निशस्त्र बाळगणाऱ्या ०२ आरोपींना अटक.

दिनांक १०.११.२०२६ चे ०१.२६ वा. चे सुमारास, खापरखेडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत असतांना, त्यांना गोपनिय माहिती मिळाली की, वार्ड क्र. ४, खापरखेडा, भीमनगर येथे राहणारा इसम नामे साहील पाटील हा आपले घरी अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, खापरखेडा पोलीस तेथे ठिकाणी गेले असता, तिथे एक इसम मिळुन आला. त्यास पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव साहील विनोद पाटील, वय २२ वर्षे, रा. घटनास्थळ असे सांगितले. त्याचे राहते घराची झडती घेतली असता, त्याचे घरात दोन काळपट सिल्व्हर रंगाचे व देशी बनावटीचे अग्निशस्त्रे किमती २५,०००/—रू. चा मुद्येमाल मिळुन आला. त्यास अग्निशस्त्राबाबत अधिक विचारणा केली असता, त्याने त्याचा नातेवाईक आरोपी नामे आर्यन अजय गुप्ता, वय २५ वर्षे, रा. वार्ड क्र. १, जयभोले नगर, चणकापुर, खापरखेडा ता. सावनेर जि. नागपुर याने दिल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन दोन देशी बनावटीची अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली. आरोपी हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने त्याचे राहते घरी आपले ताब्यात अग्निशस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने, पोलीस ठाणे खापरखेडा येथे दोन्हीही आरोपीविरूध्द कलम ३,२५ भा. ह.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडीकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संदीप बुवा, पोहवा. मुकेश महालगावे, पोअं. शेखर वानखेडे, आशिष मेश्राम, अमित खोब्रागडे, निल गंगावणे, बादल गिरी, विशाल नाकले व शोएब यांनी केली.

२) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— चोरी करणाऱ्या महीला सराईत आरोपीस अटक.

फिर्यादी अविनाश कृष्णराव कडव, वय ५० वर्ष, रा. इंदीरा नगर, जाटतरोडी, गली क्र. १, पोलीस चौकी जवळ, नागपूर यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे येऊन तक्रार दिली की, ते काम करीत असलेल्या पोलीस ठाणे हद्दीतील पुष्पकुंज अपार्टमेंट, हॉटेल सेंटर पॉईन्ट चे बाजुला, येस बॅकेंच्या खाली असलेल्या आस पॅथालॉजी लॅबोरेटरी येथे दिनांक ०९.१०.२०२६ चे १५.४० वा. चे सुमारास, एका अनोळखी महिलेने लॅबमध्ये येऊन, फिर्यादीची नजर चुकवुन काऊंटरमधील रोख १०,५००/—रू. चोरी करुन घेऊन गेली. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम ३०३(२) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात सिताबर्डी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व मिळालेल्या गुप्त माहितीवरुन, महिला आरोपी नामे अनिता नामदेव चौधरी, वय ३९ वर्ष, रा. रेल्वे क्वॉर्टर ग्राऊंड बाजुला, गुलमोहोर बारसमोर, सिताबर्डी, नागपूर हिला पोलीस ठाणे हद्दीत मोरभवन परिसरात

संशयीतरित्या वावरतांना ताब्यात घेतले. तिला गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपुस केली असता, तिने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेल्या रकमेपैकी रोख १,९००/—रू. जप्त करण्यात आले. तिचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तिचेविरुध्द विविध पोलीस ठाणे येथे चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. आरोपी ही चोरीचे गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. महीला आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सुहास राऊत, पोउपनि. विनोद तिवारी, पोहवा. उमेश कसलीकर, पोअं. सैयद वाहीद व मपोअं. अनिता वरखडे यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी व त्यांचे वडील नामे मंगल हिराजी मावस्कर, वय ४६ वर्षे, रा. वार्ड क्र. १, मोहगांव झिल्पी, तह. हिंगणा, जि. नागपुर हे पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, मोहगांव झिल्पी येथील मधुर हॉटेल व ढाबा येथे काम करतात. दिनांक ०९.११.२०२६ चे १९.०० ते २०.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील हे ढाब्याजवळील रोडने पायदळ जात असता, कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायी जाणाऱ्या फिर्यादीचे वडीलांस धडक देवुन व गंभीर जखमी करून, घटनास्थळावरून पळुन गेला. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय, हिंगणा येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी करण मंगल मावस्कर, वय १९ वर्षे, रा. वार्ड क्र. १, मोहगांव झिल्पी, तह. हिंगणा, जि. नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे इमामवाडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, रामबाग, मिलींद बुध्द विहारमागे येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती मिरा नामदेव काळबांडे, वय ५० वर्ष ह्या दिनांक ०९.११.२०२६ चे २४.०० वा. चे सुमारास, त्यांचे राहते घराचे

पहील्या माळ्याचे बेडरुममध्ये झोपल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराची कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील किचनरूम मधील डब्ब्यामध्ये ठेवलेले रोख १,२०,०००/–रू. व सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने तसेच, ०७ स्टीलचे टिफीन डब्बे असा एकुण किंमती २,९८,१००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. प्रविण लाखनकर यांनी अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे गणेशपेठ :– दिनांक ०८.११.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, घाट रोड वरील आस्था निवारागृह येथे वास्तव्यास असलेले निराधार इसम नामे प्रदीप लोखंडे, वय ६५ वर्ष यांची प्रकृति खराब झाल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ०९.३० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाचे नातेवाईकांची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सपोनि. जितेंद्र गाडगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे पाचपावली :– फिर्यादी श्रीमती माया विक्रम समुद्रे, वय ४२ वर्षे, रा. वैशाली नगर घाट जवळ, आझाद बुनकर कॉलोनी, आंबेडकर वार्ड, पाचपावली, नागपूर यांनी पोलीस ठाण पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. माही विक्रम समुद्रे, वय २० वर्षे ही दिनांक २४.१०.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास राहते घरुन कुठेतरी निघुन गेला. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे, अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ६ इंच, केस–काळे लांब, डोळे– काळे, अंगात– काळ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



कु. माही

स्वा/–
(अमित देशमुख)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.